माहिती अधिकार

महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय,
कोंढवा-येवलेवाडी,पुणे महानगरपालिका.
कार्यालयाचा पत्ता :- जे.एस.पी.एम.बिल्डींग,
सावंत कॉर्नर,कात्रज, पुणे-४६.
कार्यालयाचा संपर्क क्र.:- ०२०-२५५०८८००
ईमेल :kondhwa@punecorporation.org
विस्तारित क्रमांक :- ०२०-२५५०८८०२/०३
जावक क्र. ६८२ दिनांक :- १२/५/२०२३

अपिल प्राधिकारी तथा महा.सहा.आयुक्त, कोंढवा-येवलेवाडी
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय

अपिल क्र.:अ.प्रा.तथा महा.सहा.आयुक्त कार्यालय कोंढवा-येवलेवाडी /पुणे मनपा/अपिल/दि.१७/०४/२०२३

१. अपिलकर्ता श्री.जनार्दन रामचंद्र तारू
राहणार :- स.नं.६६७/२ रोहिणी अपार्टमेंट बी १४ बिबवेवाडी पुणे

२. मा जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ आरोग्य निरीक्षक
आरोग्य विभाग, पुणे महानगरपालिका.
तसेच मा.सहायक जन माहिती अधिकारी तथा आरोग्य निरीक्षक
आरोग्य विभाग, पुणे महानगरपालिका.

श्री. जनार्दन तारू
विरूध्द
जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ आरोग्य निरीक्षक , आरोग्य विभाग, पुणे महानगरपालिका. तसेच मा.सहायक जन माहिती अधिकारी तथा आरोग्य निरीक्षक आरोग्य विभाग, पुणे महानगरपालिका.

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल**

अपिलकर्ता श्री. जनार्दन तारू यांचा माहिती अधिकाराचा अर्ज घनकचरा व्यवस्थापन कार्यालयाकडून कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालयास दिनांक १०/०३/२०२३ रोजी प्राप्त झाला. सदर अर्जात अर्जदाराने पुणे मनपा हद्दीत सार्वजनिक रस्त्यावर सार्वजनिक शौचालयाची वणवण असल्याने या संदर्भात पीएमसी केअरवर फोटोसह वारंवार तक्रार केली आहे. याबाबत विभाग प्रमुख व सहायक आयुक्त यांच्या दैनदिनी मधील सर्व पानांच्या प्रती जागेवरील फोटो पाहणी अहवाल वरिष्ठ यांचेशी झालेला पत्रव्यवहार, कनिष्ठ कर्मचारी अधिकारी यांचेवर केलेली कार्यवाही तसेच विभाग प्रमुख व सहायक आयुक्त यांचेवर अतिरिक्त आयुक्त व प्रशासक यांनी केलेल्या दंडात्मक कारवाई व खाते कारवाई, माफीनामा ई च्या सही शिक्याच्या प्रती मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे.

सदर अर्जात विचारले प्रमाणे इकडील कार्यालयाकडील उपलब्ध माहितीचे एकूण १८ पृष्ठे जा.क्र.१५५ दि.१२/०४/२०२३ अन्वये अर्जदारास विनामुल्य पुरविलेचे मा.जन माहिती अधिकारी तथा, वरिष्ठ आरोग्य निरीक्षक , आरोग्य यांनी कळविले.



O/C माहिती अधिकार / लोहे

माहिती अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकाऱ्याने उपलब्ध करून दिलेली माहिती व इतर पत्र व्यवहारासंबंधी माहिती खालीलप्रमाणे आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील- | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती अधिकारातर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक | माहिती उपलब्ध करून द्यावयाचा अंतिम दिनांक | अपिलार्थी उत्तर पाठविल्याचा दिनांक | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
| १०/०३/२०२३ | ९/०४/२०२३ | १२/०४/२०२३ | निरंक | १२/०४/२०२३ |

**प्रथम अपिल अर्ज दाखल करण्याचे कारण** – श्री.तारू यांनी अपिल अर्जात पुढीलप्रमाणे नमूद केले आहे-

माहितीचा अधिकार अधिनियमाअंतर्गत ऑनलाईन अर्ज दि ३/१/२०२३ व प्रत्यक्ष उपस्थित राहून व पोच घेवून दि २३/२/२०२३ चे अर्जाने मागणी केलेली कागद अर्जदारास देण्यास मुद्दाम टाळाटाळ करणे कागदपत्रे देण्यास नकार देणे , अर्जदाराच्या अर्जांना उत्तर न देणे कागदपत्रे देण्यास मुद्दाम विलंब लावणे इ. कारणासाठी अपील अर्ज दाखल केला आहे

| प्रथम अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का ? | प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का ? | प्रथम अपिल सुनावणी सुचना पाठविल्याचा दिनांक |
| ९/५/२०२३ | १७ /०४/२०२३ | होय | - | १)जा क्र ३६९ दि. २४/४/२०२३<br>२)जा क्र. ४८० दि.२८/४/२०२३<br>तमेच दूरध्वनी वरून |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ :- दि.९/५/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता
सुनावणीस अपिलकर्ता :- उपस्थित
सुनावणीस जनमाहिती अधिकारी :- उपस्थित

जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | अर्जदाराने मागितलेली माहिती | जनमाहिती अधिकाऱ्याने दिलेले उत्तर/माहिती |
|---|---|---|
| १ | सदर अर्जात अर्जदाराने पुणे मनपा हद्दीत सार्वजनिक रस्त्यावर सार्वजनिक शौचालयाची वणवण असल्याने या संदर्भात पीएमसी केअरवर फोटोसह वारंवार तक्रार केली आहे. यावाबत विभाग प्रमुख व सहायक आयुक्त यांच्या दैनदिनी मधील सर्व पानांच्या प्रती जागेवरील फोटो पाहणी अहवाल वरिष्ठ यांचेशी झालेला पत्रव्यवहार, कनिष्ठ कर्मचारी अधिकारी यांचेवर केलेली कार्यवाही तसेच विभाग प्रमुख व सहायक आयुक्त यांचेवर अतिरिक्त आयुक्त व प्रशासक यांनी केलेल्या दंडात्मक कारवाई व खाते कारवाई, माफीनामा ई च्या सही शिक्याच्या प्रती मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. | सदर अर्जात विचारले प्रमाणे इकडील कार्यालयाकडील उपलब्ध माहितीचे एकूण १८ पृष्ठे जा.क्र. १५५ दि.१२/०४/२०२३ अन्वये अर्जदारास विनामुल्य पुरविलेचे मा.जन माहिती अधिकारी तथा, वरिष्ठ आरोग्य निरीक्षक , आरोग्य यांनी कळविले. |

<u>विवेचन</u>

सदर अर्जात विचारले प्रमाणे कोंढवा येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालयाकडील उपलब्ध माहितीचे एकूण १८ पृष्ठे जा.क्र. १५५ दि.१२/०४/२०२३ अन्वये अर्जदारास विनामुल्य पुरविलेचे मा.जन माहिती अधिकारी तथा, वरिष्ठ आरोग्य निरीक्षक , आरोग्य विभाग यांनी कळविले. तसेच १८ पृष्ठे जा.क्र. १५५ दि.१२/०४/२०२३ अन्वये विनामुल्य मिळाले असलेचे अपिलकर्ता श्री जनार्दन तारू यांनी सांगितले.

**-: आदेश :-**

माहिती अधिकार अर्जात अपिलार्थी यांनी मागणी केले नुसार, तसेच जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करून दिलेल्या माहिती व्यतिरिक्त कार्यालयाकडील उपलब्ध अभिलेखे दहा दिवसांचे कालावधीमध्ये अपिलार्थी यांना उपलब्ध करून देणेत यावीत व त्याबाबतचा अहवाल आमचेकडे सादर करावा.

(डॉ.ज्योती धोत्रे)
अपिल प्राधिकारी तथा महा.सहा.आयुक्त
कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय
पुणे महानगरपालिका

दिनांक आणि ठिकाण: १२/०५/२०२३,पुणे.

टीप :- १. सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास माहिती अधिकार अधिनियम कलम १९(३)नुसार मा.आयुक्त,राज्य माहिती आयोग,नविन प्रशासकिय इमारत,विधानभवन समोर पुणे ४११००१ यांचेकडे अपिल करता येईल.

२. प्रथम अपील सुनावणी आदेशाची प्रत सुनावणी नंतर सात दिवसांच्या मुदतीत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रत :-

१. अपिलकर्ता श्री.जनार्दन रामचंद्र तारू
राहणार :- स.नं.६६७/२ रोहिणी अपार्टमेंट बी १४ बिबवेवाडी पुणे.

२. मा जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ आरोग्य निरीक्षक
आरोग्य विभाग, पुणे महानगरपालिका.
तसेच मा.सहायक जन माहिती अधिकारी तथा आरोग्य निरीक्षक
आरोग्य विभाग, पुणे महानगरपालिका.

यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.......